(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT /Vol. XI / Issue – IV ISSN 2277-8063

# छत्रपती शाहू महाराज :सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ

**प्रा.महादेव श्रावण गायकवाड**, सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग, सांगोला महाविद्यालय, सांगोला

---

**प्रस्तावना:**

२० शतकाच्या पहिल्या दोन दशकात महाराष्ट्राचे सामाजिक जीवन ढवळून काढणारी,सामाजिक समतेची प्रतिष्ठापना करण्यासाठी अविश्रांत परिश्रम करणारी, बहुजन समाज व विशेषतः अस्पृश्य, स्त्री,भटके या सामाजिक सत्तेच्या परिघाबाहेरील सर्व शोषित, वंचित, उपेक्षित वर्गाची अस्मिता जागृत करून त्यांच्या सर्वांगीण उद्धाराचे कार्य करणारी लोकोत्तर व्यक्ती म्हणजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज होय. नायक हा जीवनाच्या सर्वच क्षेत्रात नायक असतो असे प्रसिद्ध तत्वविते थॉमस कार्लाईल यांनी म्हटले आहे.[१]

२ एप्रिल १८९४ या ऐतिहासिक दिवशी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाचा कारभार हाती घेतला.[२] शाहू महाराजांनी राज्यकारभार हाती घेतला आणि इथल्या सामाजिक,सांस्कृतिक, आर्थिक व प्रशासकीय क्षेत्रातील ब्राह्मणी वर्चस्व मोडून काढले. सर्व क्षेत्रातील सत्तेच्या चाव्या कोल्हापूर संस्थानातील बहुजनांच्या हाती दिल्या. 13 जानेवारी १९४० रोजी कोल्हापूर येथे संपन्न झालेल्या कोल्हापूर दलित प्रजा परिषदेच्या अध्यक्ष भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, 'छत्रपती शाहूंनी समाजातील विषमता नष्ट करण्याचा आटोकाठ प्रयत्न केला व ब्राह्मण्याचा किल्ला ढासळवून टाकला'.[३] शाहू महाराजांना एक समाज सुधारक म्हणून नाही तर शासन व्यवस्था म्हणून समजून घेणे गरजेचे आहे. या व्यवस्थेने काय काम करावे, कसे करावे, कसा विचार करावा, सामाजिक आणि आर्थिक जीवनात कशा पद्धतीची लोकशाही निर्माण करावी याचं आदर्श उदाहरण म्हणजे राजर्षी शाहू महाराज होय. शाहू महाराज कोल्हापूर संस्थानचे राजे होते परंतु त्यांच्या कर्तुत्वाने कोल्हापूर संस्थानाच्या मर्यादा केव्हाच ओलांडल्या होत्या.

**सामाजिक लोकशाही म्हणजे काय?**

संविधान सभेमध्ये संविधान सुपूर्द करताना २५ नोव्हेंबर १९४९ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भाषणात सामाजिक लोकशाहीची व्याख्या केली होती. डॉ.आंबेडकर म्हणतात प्रत्यक्षात जर लोकशाही अस्तित्वात यावी अशी जर आपली इच्छा असेल तर तीन गोष्टी कराव्या लागतील.

१) आपल्या सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी संविधानिक मार्गाची कास धरली पाहिजे.

२) दुसरी गोष्ट म्हणजे जॉन स्टुअर्ट मिल यांनी दिलेला सावधानतेचा इशारा लक्षात ठेवावा लागेल."त्यांच्या मते लोकांनी आपले स्वातंत्र्य कितीही मोठा माणूस असला तरी त्याच्या चरणी अर्पण करता कामा नये तसेच त्याच्यावर इतका विश्वास ठेवू नये की जेणेकरून त्याला प्राप्त अधिकारांचा तो लोकांच्या संस्था उध्वस्त करण्यासाठी प्रयत्न करेल"

आयरिश देशभक्त डॅनियल ओकानन यांचं एक वक्तव्य बाबासाहेबांनी याच ठिकाणी सांगितलं होतं.'कोणताही माणूस स्वाभिमानाचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करू शकत नाही कोणतीही स्त्री स्वतःच्या शिलाचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करू शकत नाही आणि कोणताही देश स्वतःच्या स्वातंत्र्याचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करू शकत नाही.'

३) तिसरी गोष्ट आपण केली पाहिजे ती म्हणजे केवळ राजकीय लोकशाहीवर आपण समाधान मानता कामा नये राजकीय लोकशाहीचे आपण सामाजिक लोकशाहीमध्ये परिवर्तन करायला हवं हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी निक्षून सांगितलेले दिसते.[४] भारतातील व महाराष्ट्रातील सामाजिक व्यवस्थेचा विचार करता १८९४ ते १९२२ या २८ वर्षाच्या कालखंडात छत्रपती शाहू महाराजांनी चातुर्वर्ण्य जाती व पोटजाती व्यवस्था लक्षात घेऊन दलित, शोषित, वंचित, उपेक्षित समाजासाठी कल्याणकारी धोरण व कायदेशीर तरतुदींची क्रांतिकारी अंमलबजावणी केली होती. म्हणूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकर ४ सप्टेंबर 1921 रोजी शाहू महाराजांना लिहिलेल्या पत्रात म्हणतात, आपली प्रकृती ठीक आहे अशी मला आशा आहे आपली आम्हाला फार जरुरी आहे कारण हिंदुस्तान प्रगती करत असलेल्या सामाजिक लोकशाहीच्या महान चळवळीचे आपण एक आधारस्तंभ आहात.[५]

**अस्पृश्यता निवारणाचे कार्य:**

1901 च्या कोल्हापूर जनगणनेच्या अहवालात अस्पृश्यांचे वर्णन दिले आहे. त्यांच्या परिस्थितीवर प्रकाश टाकला आहे. अस्पृश्यांची संख्या 1901 साली कोल्हापूर आणि एसएमसी मध्ये १,०३,८८९ होती असे अहवालावरून दिसते. यात महार मांग ढोर चांभार या अस्पृश्यांचा समावेश केला गेला.[६]अस्पृश्य समाज हा जातीव्यवस्थेमध्ये सर्वात खालच्या थराला होता. राजर्षी शाहूंना या समाजातला आत्मसमान आणि प्रतिष्ठा प्राप्त करून द्यावयाची होतीच. त्याचबरोबर त्यांची आर्थिक प्रगती होणे हे देखील गरजेचं आहे असे वाटत होते.

देशाच्या स्वातंत्र्यासाठी ज्यांनी ब्रिटिशाविरुद्ध आंदोलने करून स्वातंत्र्य पैदा केले त्यांनाच राष्ट्रपुरुष म्हणणे किंवा त्यांनीच राष्ट्राचे जडणघडण केली असे म्हणणे म्हणजे इतिहासाचे मोठे अज्ञान आहे. देशाच्या स्वातंत्र्यासाठी जे लढले ते राष्ट्रपुरुष खरेच. पण जे देशातील ९५% मागासलेल्या समाजाच्या उद्धारासाठी खपले त्यांच्या सामाजिक समतेच्या व न्यायाच्या हक्कासाठी लढले ते राष्ट्रपुरुष नव्हते काय? राष्ट्र केवळ राजकीय स्वातंत्र्याने घडत नाही त्या राष्ट्रांना समाज सामाजिक समतेच्या पायावर उभा करावा लागतो. त्यासाठी सामाजिक ऐक्य व बंधुभाव यांची गरज असते.[७] महाराजांनी संस्थानातील जातीव्यवस्था व अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी अनेक कायदे केले. त्यांचे पडसाद शिक्षण क्षेत्रातही उमटले.२८ सप्टेंबर १९१९ रोजी महाराजांनी संस्थानातील अस्पृश्यांच्या शाळा बंद केल्या व अस्पृश्य मुलास सरकारी शाळातून इतर लोकांच्या मुलाप्रमाणे दाखल करून घेतले जावे सरकारी शाळातून शिवाशिव नसल्याने सर्व जातींच्या व धर्माच्या मुलास एकत्रित बसवण्यात यावे.[७]२७ जुलै १९१८ ला आदेश काढून अस्पृश्यावर लाभलेली अमानुष अशा हजेरीचे पद्धतीचे निर्मूलन करण्यात आले.[८] भारतीय संसदेने साली अस्पृशता निवारणाचा कायदा केला.जी गोष्ट घडण्यास देशाला स्वातंत्र्यानंतर काही काळ वाट पाहावी लागली ते कार्य शाहू महाराजांनी 30 ते 35 वर्षे अगोदरच केले होते.[९] अस्पृश्यता या शब्दाची त्यांना चीड होती. अस्पृश्यता शब्द कोणत्याही मानवास लावणे ते नींद्य आहे असे त्यांचे सांगणे होते. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी चाबुकस्वार, मोटारचा ड्रायव्हर, माहुत, खाजगी नोकर महार असतील अशी व्यवस्था त्यांनी केली होती.[१०]दलितांची नावे भंगी,महार,चांभार या नावात अस्पृश्यता चिकटली आहे. ती काढून टाकण्यासाठी या जातीतील पैलवानांना नवीन नावे दिली. महार पैलवानांना हाक मारतेवेळी 'जाट' पैलवान, चांभारांना 'सरदार' व भंग्यांना 'पंडित' अशी नावे ठेवली. यामुळे दुसऱ्या जातीतील पैलवान पैलवानांना आपण महारबंगी चांभार जातीतील पैलवानाशी खेळत आहोत ही कल्पनाही येत नव्हती.[११] महाराजांचे अस्पृश्य वर्गावर खूप प्रेम होते. महाराज शिरोळा शिकारीला गेले असता चहासाठी म्हणून शिरोळच्या महारांना त्यांच्या तक्यात सर्वांची सोय करायला सांगितले.महाराज एकटेच तक्यात गेले नाहीत तर बायकांना भाग घेता यावा म्हणून हळदी कुंकवाचा कार्यक्रम ठेवला व त्या ठिकाणी राणीसाहेब, अक्कासाहेब व इंदुमतीदेवी यांना मुद्दामून बोलावून घेतले. इंदुमतीदेवींना तर चार शब्द बोलायला देखील लावलं.[१२] महाराज जातीव्यवस्था नष्ट करण्याचे सांगत असताना जपानमधील एक उदाहरण देतात, ते म्हणतात जपानमधील सामुराई लोकांनी आपला जन्माने प्राप्त झालेला उच्च दर्जा सोडून दिला म्हणून जपानमध्ये ऐक्य होऊन त्या देशाची उन्नती झाली आणि त्याच प्रमाणे ब्राह्मणांनी जातीमत्सर सोडल्याशिवाय आमची प्रगती होणार नाही.[१३] ते म्हणतात, मी प्रथम अगदी कंजर्वेटिव्ह म्हणजे जुन्या मताचा कट्टा अभिमानी होतो. जातिभेद कायम राहिला पाहिजे व पाळला पाहिजे असे माझे मत होते. अशा दुराभिमानाने इतरांची उन्नती होण्याच्या मार्गात मी अडथळा करतो याची मला जाणीव नसे.[१४] स्वतःची चूक कबूल करणं ही एक निधड्या छातीचा व्यक्तीच करू शकतो असे यावरून आपणास दिसून येते.

**आंतरजातीय विवाह:**

छत्रपती शाहू महाराज हे कृतिशील विचारवंत होते. कर्ते समाज सुधारक होते. जातीभेदाच्या निर्मूलनासाठी त्यांनी अनेक आंतरजातीय विवाह घडवून आणले. महाराजांच्या चुलत भगिनी 'चंद्रप्रभाबाई' यांचा विवाह इंदूरच्या तुकोजीराव होळकरांचे पुत्र यांच्याशी निश्चित केला. मराठ्यातील उच्च कुलिन घराण्याची धनगर समाजाशी वैवाहिक संबंध जोडण्याची मानसिकता तयार व्हावी म्हणून करवीरच्या शंकराचार्याकडून मराठ-धनगर एक आहेत असा अभिप्राय त्यांनी मिळवला.[१५] कोल्हापूर व इंदूर या दोन संस्थांच्या दरम्यान १०० मराठा धनगर आंतरजातीय विवाहची योजना त्यांनी आखली.[१६]या विवाह ६० हजार रुपये खर्च करायचे व या विवाहातील जोडप्यांना उभय राजांनी आपापल्या राज्यातील जमीन जुमला देऊन सहकार्य करायचे असे ठरले. या योजनेप्रमाणे २५ विवाह साजरे झाले. जातीभेदाच्या निवारणाचा महत्त्वाचा मार्ग म्हणून रोटीबीटी व्यवहाराचा आजही उल्लेख केला जातो त्या काळात आंतरजातीय विवाह करणे म्हणजे संकट ओढवून घेण्यासारखेच होते.समाज प्रचंड साना त्यांनी होता परंतु संकटांना समोर जाण्याचा मार्ग शाहू महाराजांच्या व्यक्तिमत्त्वात होता. त्यांनी केवळ भाषणे आणि कायदा करून विषय सोडून दिला नाही तर त्याची सुरुवात स्वतःच्या घरापासून केली.[१७]

**स्त्री उद्धाराचे प्रणेते:**

राजर्षी शाहूंनी स्त्रियांना पुरुषांच्या गुलामगिरीतून मुक्त करावे आणि त्यांना स्वतंत्र जगता यावे यासाठी अत्यंत महत्त्वाचे कायदे केले. जुलै 1917 मध्ये त्यांनी आपल्या संस्थानात विधवांच्या पुनर्विवाह कायदेशीर मान्यता देणारा कायदा केला तसेच या कायद्यानुसार विवाहाची कायदेशीर नोंदणी करण्याची पद्धत सुरू केली.[१८] १९१९ मध्ये कोल्हापूर संस्थानातील विवाह संबंधी कायदा पास केला हिंदू व जैन या मुख्य धर्माच्या लोकांना जातीनिर्बंध न पाहता आपल्या कोणत्याही धर्माच्या मनुष्याशी विवाह करण्याची मुभा दिली.या कायद्यानुसार पुरुषाचे विवाहाचे वय 18 वर्षे तर स्त्रीचे वय

14 वर्षे ठरविण्यात आले. १८ वर्षे पूर्ण झालेल्या स्त्रीस विवाह साठी पिता किंवा पालकाच्या संमतीची आवश्यकता राहणार नाही अशी तरतूद केली. नव्या कायद्यानुसार झालेल्या आंतरजातीय लग्नास कायदेशीर मान्यता देण्यासाठी शाहूंनी एक खास विवाह नोंदणी अधिकारी (द रजिस्टर ऑफ मॅरेज) नियुक्त केला होता.[१९] स्त्रियांवर होणारे कौटुंबिक अत्याचार रोखण्यासाठी १९१९ मध्ये क्रूर वर्तनास प्रतिबंध करणारा कायदा केला या कायद्याची प्रस्तावना शाहू महाराजांनी लिहिली व त्यात ते म्हणतात,काही स्त्रियांना इतका त्रास होतो सासूकडून नवऱ्याकडून नणंदेकडून काय काय वेळेला धरणी मला पोटामध्ये घेईल तर बरे होईल असे वाटते.अशा सुद्धा स्त्रियांची दखल शाहू महाराजांनी घेतली.[२०] या कायद्याचे महत्त्व असे की हा कायदा संपूर्ण भारतामध्ये तर नव्हताच पण अशा प्रकारचा कायदा युरोपमध्ये देखील नव्हता. आपल्या भारतीय संसदेने The Protection of Women from Domestic Violence Act २००५.२१ त्याचप्रमाणे १९१९ मध्ये घटस्फोटाचा कायदा करून स्त्रियांना घटस्फोट घेण्याचे स्वातंत्र्य दिले या कायद्यानुसार घटस्फोटीत स्त्रीच्या अन्न वस्त्राच्या खर्चाची पोटगीची व शिक्षणाबद्दलची व्यवस्था केली होती. समाजामध्ये देवदासींचा दुर्दैवी वर्ग होता यामध्ये जोगतीन, मुरळी, भावी इत्यादी प्रकार असत. अस्पृश्यतेप्रमाणे हा समाजावरील कलंक होता. १९२० मध्ये देवदासी प्रथा प्रतिबंध कायदा करून देवदासी स्त्रियांना आई-वडिलांच्या संपत्तीत वाटा मिळवून दिला.[२२] त्यांनी हे कायदे स्त्रियांच्या आत्मसन्मानाचे व स्वातंत्र्याचे कायदे केले. त्यांचे विचार काळाच्या किती पुढे होते हे यावरून दिसून येते.

**नोकऱ्यांमध्ये संधी व समानता:**

१९९४ मध्ये कोल्हापूरच्या दरबारात एकूण ७१ अधिकाऱ्यांपैकी ६० ब्राह्मण व महाराजांच्या खाजगी नोकर वर्गात ५२ पैकी ४५ ब्राह्मण होते.[२२] २० व्या शतकाच्या प्रारंभी करवीर राज्यात महार मांग चांभार वडोर या चार अस्पृश्य जाती होत्या व त्यांची लोकसंख्या १,०३,८८९ इतकी होती. महारांकडे गावच्या वेसकराची भूमिका असे याशिवाय मेलेली जनावरे ओढणे, फाडणे, सोडणे इत्यादी कामे करीत. शेतकऱ्यांना उपयोगी पडणारे दोर नाडा मांग वळीत. चांभार पायताणे बनवीत. कातडी कमावून ढोर चांभारांना सहाय्यभूत होत. अस्पृश्यांची जीवन स्थिती अत्यंत हालाखीची व शोचनीय होती.[२३] अशा परिस्थितीत शाहू महाराजांनी या वर्गातील हिनगंड नष्ट करण्यासाठी स्वाभिमान जागृत करण्यासाठी चार उपक्रमांची योजना आखली. शैक्षणिक लोकसंपर्कीय प्रशासकीय आणि कायदे कानून या उपक्रमांच्या माध्यमातून शाहू महाराजांनी अस्पृश्यांच्या उन्नतीच्या कार्यक्रमास सुरुवात केली. महाराजांनी करवीर संस्थांच्या सरकारी व खाजगी नोकऱ्या अस्पृश्यांना संधी देऊन त्यांचा आत्मविश्वास वाढवला.त्यांचा स्वाभिमान जागृत केला. शाहू महाराजांनी लष्करी फडात चार अस्पृश्यांची नेमणूक केली त्यापैकी दोन महार व दोन मांग होते.[२४] महाराजांनी ५ ऑगस्ट १९१८ रोजी खास हुकूम काढला की अस्पृश्य लोकांपैकी जे लोक आपल्या कर्तबगारिने व बुद्धीने पुढे येतील त्यास भाग कारकून व अव्वल कारकून अशा प्रकारच्या जागा दिल्या.[२५] रेवेन्यू,पोलीस, जुडीशियल व जनरल इत्यादी कोणत्याही डिपार्टमेंटच्या मुख्याच्या जागेवर नेमण्यात येईल. इत:पर त्यांच्या अस्पृश्यत्वाची सबब सरकारी नोकरीच्या बाबतीत ऐकून घेतली जाणार नाही.

१९२० मध्ये शहरातील पोलीस गेटवर १६ महारांची नेमणूक केली. या लोकांचा दर्जा वाढवा म्हणून आपण हे करत आहोत असे सांगितले.[२६]'जोहार मायबाप' म्हणणारे महार मराठा रयतांकडून राम राम स्वीकारू लागले. जे महार चावडीच्या पायरीवर सुद्धा बसू शकत नव्हते ते शाहूंच्या कृपेने पाटलाच्या मांडीला मांडी लावून बसू लागले. शंभर वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील ग्रामीण भागात हे सामाजिक चित्र महाराजांनी निर्माण केलं होतं हे चित्र म्हणजे सामाजिक बदल नव्हता तर एक सामाजिक क्रांतीच होती.[२८]

**अस्पृश्यांचे राजकीय नेतृत्व:**

महाराज म्हणतात अस्पृश्य वर्गाने राजकारणात मुक्तीसाठी व उन्नतीसाठी वरिष्ठ वर्गातील पुढारी घेऊ नयेत. आपल्याच जातीचा पुढारी करावा. ते म्हणतात, 'पशु देखील आपल्या जाती शिवाय पुढारी स्वीकारत नाही मग तुम्ही मनुष्यांनी का स्वीकाराव? हरणाच्या कळपात डुक्कर पुढारी नसते किंवा डुकरांच्या कळपात हरण पुढारी नसते. कबुतरांच्या कळपात कधी बदके पुढारी नसतात किंवा बदकांच्या कळपात कधी कावळे पुढारी नसतात मग मनुष्याच्या कळपात दुसऱ्या जातीचे पुढारी का असावेत?[२९] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात मानगाव परिषदेच्या व्यासपीठावरून झाली.माणगाव परिषदेमध्ये महाराज म्हणतात, तुमचा खरा पुढारी तुम्ही शोधून काढलात याबद्दल मी तुमचे अंतकरणपूर्वक अभिनंदन करतो मला खात्री आहे की डॉक्टर आंबेडकर तुमचा उद्धार केल्याशिवाय राहणार नाहीत तर एक वेळ अशी येईल की ते सर्व हिंदुस्तानचे पुढारी होतील माझी मनोदेवता मला सांगते आहे.महाराजांचे भाकीत अतिशय अचूक होते.[३०]महाराजांनी आपल्या संस्थानातील वातावरणच पूर्ण बदलून टाकल्यामुळे दत्तोबा पवार सारखे दलित नेत त्यांच्या काळात नगरपालिकेचे अध्यक्ष होऊ शकले. ३० ध्रुवनाथ घोलप हे देखील महाराजांनी केलेल्या मदतीमुळेच स्वतःचे शिक्षण

पूर्ण करू शकले व १९२४ मध्ये मुंबई इलाख्याच्याकायदेमंडळात अस्पृश्यांचे पहिले प्रतिनिधी म्हणून निवडून गेले.[३१]शाहू महाराजांच्या कारकिर्दीच्या अखेरीस भंगी समाजाचाही म्युनीसिपालटीच्या कारभारात प्रवेश झाल्याचे दिसते. महाराजांनी महाराजांनी हिरा मदार भंगी यास लोकनियुक्त कमिटीवर मुनिसिपल मेंबर म्हणून नेमल्याची एक नोंद आढळते.[३२] याशिवाय कोल्हापूरमध्ये सत्यशोधक हॉटेल चालवणारे गंगाराम कांबळे हे देखील कोल्हापूर संस्थानातील अस्पृश्य समाजाचे अतिशय प्रतिष्ठित पुढारी होते.

राजर्षी शाहूंच्या या अद्वितीय अलौकिक कार्यामुळे अस्पृश्य समाज त्यांना देवासमान मानतो खुद्द बाबासाहेब म्हणतात शाहू महाराजांसारखा सखा अस्पृश्यांना पूर्वी लाभला नव्हता व पुढील की नाही याबद्दल शंका व्यक्त करतात यातच त्यांच्या कार्याचा गौरव दिसून येतो.

**समारोप:**

दिल्लीमध्ये १३ व १४ फेब्रुवारी १९२२ रोजी ग.आ.गवई यांनी पुढाकार घेऊन अस्पृश्यांची तिसरी अखिल भारतीय परिषद भरवली. या परिषदेसाठी ६०००० हजार अस्पृश्य उपस्थित होते. या अस्पृश्यांसमोर राजर्षी शाहूंचे भाषण झाले. मात्र ते महाराजांचे अखेरचे भाषण होते हे मात्र कोणाच्याही ध्यानीमनी नव्हते.[३३] महाराज जवळ येतात ६०००० अस्पृश्यांमधून एकाच जयघोषानेने उसळी घेतली 'दलितोधारक शाहू महाराज की जय'या जयघोषाने आकाश वाटते की काय असे वाटत होते या दर्शनाने आपोआप त्यांच्या डोळ्यातून पाणी येऊ लागले."देवळातील देव आम्ही कधी पाहिला नव्हता. त्या देवाने आम्हाला कधी काही दिले नाही. पण आमच्या या देवाने सर्व काही दिले"[३४]असे म्हणून महाराजांना दुवा देऊ लागले. शाहू महाराजांच्या निधनानंतर 'बहिष्कृत भारत' मध्ये श्री छत्रपती शाहू 'आमचा अब्राहम लिंकन' या लेखात ग आ.गवई लिहितात, 'अविद्येच्या पायी जे मानसिक गुलाम बनले आणि अस्पृश्यतेच्या खोड्याने जे जनावरापेक्षाही आगतीक झाले ज्यांची अस्पृश्यता काढण्यासाठी हजारो वर्षापासून एकाही सत्पुरुषास यश आले नाही. त्या हतभागी वर्गाचा हा कलंक साफ दूर करून त्यास माणसात आणण्यास या आमच्या भगवान छत्रपतींचे ठाई परम्यात्म्याने अजब सामर्थ्य दिले होते'.[३५] एका अमेरिकी इतिहासकाराला राजर्षी शाहू महाराजांच्या भूमिकेचे फार आश्चर्य वाटते तो म्हणतो इतका मुलगा मी सामाजिक दृष्टिकोन खुल्यांसारख्या एका शेतकरी कुटुंबात आढळणे हे समजण्यासारखे आहे पण शाहू महाराजांसारख्या एका राज्यांमध्ये दिसून येणे ही फार थक्क करणारी गोष्ट आहे.[३६]

राजर्षी शाहू महाराजांनी समाज व्यवस्थेने नाकारलेल्या या समूहाला धार्मिक रूढी परंपरेच्या काळयाकुट्ट अंधारातून बाहेर काढले. आईच्या ममतेने त्यांना आधार दिला. बापाप्रमाणे त्यांच्या पोटापाण्याची व्यवस्था केली. त्यांच्यामध्ये स्वाभिमान विश्वास जागृत केला. त्यांना सक्षम बनवून माणूस बनवलं. अशा प्रकारची पराकोटीची मानवीय संवेदनशीलता स्वातंत्र्य, समता आणि बंधू या विचारातूनच जन्माला येत असते. शरीराने अत्यंत बलवान बलदंड असणाऱ्या शाहू महाराजांच्या मनात हा समतेचा नितळजरा वंचित शोषितांप्रती जिवंत होता. खरी समता सामाजिक आणि आर्थिक मालकीतून प्रस्थापित होत असते. म्हणून या वंचित समूहाला सन्मानाने माणूस म्हणून जगण्याची प्रतिष्ठेची साधने दिली. स्वतःच्या बहिणीच्या शाही लग्नात महारांना सन्मानाची भरजरी वस्त्रे देऊन त्यांच्या हातात शस्त्रे देऊन शाही पाहुण्यांच्या स्वागताला उभे करणारे[३७] राजर्षी शाहू महाराज महाराष्ट्राचा मानबिंदू आहेत. आरक्षणाचा आरंभबिंदू आहेत. मानवतेचे,उदारतेचे आणि पुरोगामीत्वाचे प्रतीक आहेत. विद्यमान भारतातील सामाजिक व आर्थिक लोकशाही जशी जशी यशस्वी होत जाईल तशी तशी शाहू महाराजांच्या कर्तृत्वाची दखल इतिहासात घेतली जाईल. 26 जून हा राजर्षी शाहू महाराजांचा वाढदिवस.हा वाढदिवस अस्पृश्य समाजाने सणाप्रमाणे सर्वत्र साजरा करावा असा ठराव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने माणगाव परिषदेने केला होता.[३८]

**संदर्भ :**

३) डॉ.जाधव रमेश , *शाहू महाराज आणि आपत्ती व्यवस्थापनाचा मानदंड* ,सकाळ,२६ जून २०२०

४) डॉ.पवार जयसिंगराव ,*राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य* ,ताराराणी बुक सर्विसेस कोल्हापूर प्रथमावृत्ती ,२०१४ पृ.२१

५) कित्ता , पृ.५५७

६) डॉ.कळसे अनंत ,*डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताच्या घटना समितीसमोर केलेली भाषणे* ,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ,नागपूर ,डिसेंबर ,२०१५ पृ.११० ,१११

७) डॉ.पवार जयसिंगराव ,*राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य* ,ताराराणी बुक सर्विसेस कोल्हापूर प्रथमावृत्ती ,२०१४ पृ.८०

८) Khane B.D. *Chhatrapati Shahu's Crusade Against untouchability,* Round Table India ,26 June 2021.

९) लोकराज्य ,*माहिती व जनसंपर्क महासंचलनालय*,मे ,२०२२ पृ.४८
१०) डॉ.पवार जयसिंगराव ,*राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ* ,महाराष्ट्र इतिहास प्रभोधिनी , कोल्हापूर प्रथमावृत्ती ,जानेवारी २००१ पृ.७४
११) कित्ता, पृ.७६
१२) डॉ.पवार जयसिंगराव,*लोकोत्तर राजा* ,लोकसत्ता,१ मे २०२२
१३) लोकराज्य,*राजर्षी श्री शाहू महाराज राज्यारोहण शताब्दी विशेषांक* ,१ ऑगस्ट १९९४, पृ.७
१४) डॉ.पवार जयसिंगराव ,*राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ* ,महाराष्ट्र इतिहास प्रभोधिनी , कोल्हापूर प्रथमावृत्ती ,जानेवारी २००१ पृ.७४६
१५) कित्ता, पृ.७५३
१६) डॉ.भोसले एस.एल.,*क्रांतीसुक्ते: राजर्षी छत्रपती शाहू*,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती महामंडळ ,मुंबई ,तृतीय आवृत्ती, जुलै २००६ पृ.२६
१७) कित्ता, पृ.२६
१८) डॉ.पवार जयसिंगराव ,*राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य* ,ताराराणी बुक सर्विसेस कोल्हापूर प्रथमावृत्ती ,२०१४ पृ.८९
१९) डॉ.पवार जयसिंगराव ,*राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ* ,महाराष्ट्र इतिहास प्रभोधिनी , कोल्हापूर प्रथमावृत्ती ,जानेवारी २००१ पृ.७०३
२०) लोकराज्य ,माहिती व जनसंपर्क महासंचलनालय,जून ,२०२२ पृ.३७
२१) डॉ.पवार जयसिंगराव ,*राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य* ,ताराराणी बुक सर्विसेस कोल्हापूर प्रथमावृत्ती ,२०१४ पृ.९१
२२) कित्ता, पृ.९२
२३) कित्ता, पृ.९२
२४) सूर्यवंशी कृ.गो.*राजर्षी शाहू राजा व राजा माणूस* ,ठोकळ प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती,१९८४
२५) कित्ता, पृ.३७४
२६) डॉ.पवार जयसिंगराव, *राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ*,महाराष्ट्र इतिहास प्रभोधिनी, कोल्हापूर प्रथमावृत्ती,जानेवारी २००१ पृ.८४
२७) कित्ता, पृ.८५
२८) उपरोक्त
२९) उपरोक्त
३०) उपरोक्त
३१) उपरोक्त पृ.९४
३२) डॉ.पवार जयसिंगराव ,*राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य* ,ताराराणी बुक सर्विसेस कोल्हापूर प्रथमावृत्ती ,२०१४ पृ.२९
३३) डॉ.पवार जयसिंगराव ,*राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ* ,महाराष्ट्र इतिहास प्रभोधिनी , कोल्हापूर प्रथमावृत्ती ,जानेवारी २००१ पृ.८५
३४) डॉ.पवार जयसिंगराव ,*राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य* ,ताराराणी बुक सर्विसेस कोल्हापूर प्रथमावृत्ती ,२०१४ पृ.७३
३५) फडके य.दि. ,*छत्रपती शाहू आणि लोकमान्य* ,श्रीविद्या प्रकाशन ,पुणे, प्रथमावृत्ती ,६ मे १९८६ पृ.२९८
३६) प्रा.साळुंखे नानासाहेब,*शाहूंच्या आठवणी*, वृषाली प्रकाशन, कोल्हापूर, दुसरी आवृत्ती, ४ जानेवारी २००७,पृ.५८
३७) डॉ.पवार जयसिंगराव ,*राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ* ,महाराष्ट्र इतिहास प्रभोधिनी , कोल्हापूर प्रथमावृत्ती ,जानेवारी २००१ पृ.७१३
३८) कित्ता, पृ.४७१
३९) उपरोक्त
४०) कित्ता, पृ.९५